My Computer/D/PRITI/Act 88

# उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे यांचे कार्यालय

वर्धावत मॅन्शन, २ रा मजला, शिवाजी पथ, ठाणे (पश्चिम)

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये आदेश

जा.क्र.उपनि/ठाणे ता./बी-३/रोझा गार्डन
ही/कलम ८८/ ३५०६ /सन २०१६.
दिनांक:-१८/०१/२०१६

वाचावे :- १) श्री. समीर ओरक यांचे दिनांक १६/०३/२०१५ रोजीचे पत्र.
२) या कार्यालयाचा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये
दि.२३/०७/२०१५ रोजीचे आदेश.
३) श्री.दिपक खांडेकर, प्राधिकृत चौकशी अधिकारी, तथा सहाय्यक निबंधक, सहकारी
संस्था,(परसेवा) मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, यांचा दि. ०४/१२/२०१५
रोजीचा या कार्यालयास दिनांक ०५/१२/२०१५ रोजी प्राप्त झालेला चौकशी अहवाल.
४) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ मधील तरतूद.

---

ज्याअर्थी, रोझा गार्डन को-ऑप.हौसिंग सोसा.लि.,पांडुरंगवाडी, सिध्दी विनायक नगर, मिरारोड (पुर्व) ता. जि. ठाणे ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ९ अन्वये नोदणीकृत गृहनिर्माण संस्था असून सदर संस्था या कार्यालयाचे कार्यकक्षेत कार्यरत आहे, आणि,

ज्याअर्थी, रोझा गार्डन को-ऑप.हौसिंग सोसा.लि.,पांडुरंगवाडी, सिध्दी विनायक नगर, मिरारोड (पुर्व) ता. जि. ठाणे या संस्थेच्या संचालक मंडळाने केलेल्या गैरव्यवहारांबाबत संदर्भ क्र.०१ चे पत्रान्वये व यापुर्वी इतर अनेक वेळोवेळी तक्रारी दाखल केल्या होत्या. आणि,

ज्याअर्थी, सदर संस्थेबाबत श्री. समीर ओरक व इतर ३, यांनी या कार्यालयात वेळोवेळी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सखोल चौकशी करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशी अधिकारी म्हणून श्री दिपक खांडेकर, प्राधिकृत चौकशी अधिकारी, तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,(परसेवा) मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, यांची उक्त वाचावे क्र. ३ अन्वयें या कार्यालयाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये दिनांक ०४/१२/२०१५ रोजीचे आदेशान्वये नियुक्ती केलेली होती. आणि,

ज्याअर्थी, सदर बाबत उक्त वाचावे क्र. ४ अन्वयें श्री दिपक खांडेकर, प्राधिकृत चौकशी अधिकारी, तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,(परसेवा) मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, यांनी दिनांक ०५/१२/२०१५ रोजी या कार्यालयास चौकशी अहवाल सादर केलेला आहे. संदर अहवालामध्ये मुद्दा क्र. २ मध्ये सन २००६ ते २०१४ या कालावधीत संस्थेंच्या सभासदांकडुन पुजा, नवरात्र उत्सवासाटी, प्रजासत्तादिन व इतर कार्यक्रमासाठी गोळा केलेल्या वर्गणी व खर्चाबाबत कलम ८८ अन्वये वसुलीस उपरोक्त कालावधीतील संचालक मंडळ पात्र असल्याचे नमुद केले आहे. तसेच मुद्दा क्र.०४ मध्यें संस्थेंचे श्री.घाग यांना संस्थेंचे दप्तर लिखाण इत्यादीसाठी प्रतीमहा रुपये २,५००/- प्रमाणे चार महिन्याचे रुपये १०,०००/- स्वत: तक्रारदार श्री. समीर ओरक यांनी आपल्या सचिव पदाच्या कार्यकाळात निश्चित करुन अदा केली असुन,सदरची रक्कम श्री. समीर ओरक यांचेकडुन कलम ८८ अन्वये वसुल करण्यांबाबत नमुद केले आहे. आणि;

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियंम १९६० चे कलम ८३ अन्वयें नियुक्त केलेल्य चौकशी अधिकारी यांनी त्यांचेकडील अहवालात सुचविल्याप्रमाणे संबंधित मुद्यांवर चौकशी करुन जबाबदारी निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये प्राधिकृत चौकशी अधिकारी नियूक्त करणे आवश्यक आहे, असे माझे मत झाल्याने मी खालील प्रमाणे आदेश दे

Scanned by CamScanner

# -: आ दे श :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०. चे कलम ८८ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार मी, दिनेश चंदेल, उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे असा आदेश देत आहे की, रोझा गार्डन को-ऑप.हौसिंग सोसा.लि.,पांडुरंगवाडी, सिध्दी विनायकनगर, मिरारोड (पुर्व) ता. जि. ठाणे या संस्थेच्या गैरव्यवहाराची व जबाबदारी निश्चित करण्यासाठी परिशिष्ट अ प्रमाणे श्री. बी. आर. मगदुम, सेवा निवृत्त, सहाय्यक निबंधक तथा प्राधिकृत चौकशी अधिकारी यांची कलम ८८ खाली प्राधिकृत चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे.

त्यांनी चौकशी करुन तीन महिन्यांचे आंत चौकशी अहवाल सादर करावा.

सदरचा आदेश माझे आज दिनांक /०१/२०१६ रोजी माझे सही व शासन मुद्रेसह देत आहे.

(दिनेश चंदेल)
उपनिबंधक
सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे.

ठिकाण :- ठाणे
दिनांक :- /०१/२०१६

Scanned by CamScanner